# शाश्वत मार्गच उपयोगी!

**पाण्याचं नियोजन करताना शाश्वत मार्गांचा अवलंब केला पाहिजे, हे सूत्र पाळलं न गेल्यामुळं अनेक समस्या ठिकठिकाणी निर्माण झाल्या आहेत. 'जलशक्ती अभियाना'त पुरंदर तालुक्याचाही समावेश आहे. याच पुरंदर तालुक्यातील खळद गावामध्ये शाश्वत मार्गाचा अवलंब करून पाणी नियोजन कसं केलं, हे जाणून घेणं 'जलशक्ती अभियाना'च्या पार्श्वभूमीवर उपयुक्त ठरेल.**




**कल्पनाताई साळुंखे / गुरुदास नूलकर**

अनेक प्रगत राष्ट्रांची आर्थिक वाढ खुंटली असताना गेल्या दशकात सातत्याने उसळणाऱ्या भारताच्या 'जीडीपी'ने सर्वांचे लक्ष वेधले आहे.'जीडीपी' वाढल्यानेच देश प्रगत होईल, या गृहिताला आव्हान न देता प्रत्येक सरकार आपली धोरणे बांधत गेले आहे. सामान्य शहरी माणसाचे जीवन आर्थिक वृद्धीने सुधारले आहे असे जरी मानले, तरी संपूर्णपणे पाण्यावर अवलंबून असलेली देशातील शेतीची अर्थव्यवस्था मात्र दर वर्षी दुष्काळाने मोडकळीस येते. 'जीडीपी' वाढूनही देशाचा पाणी प्रश्न काही सुटलेला नाही, किंबहुना त्याचा पाठपुरावा करताना समस्या वाढत चालली आहे, असे म्हणणे गैर नाही. केंद्र आणि राज्य सरकार, स्थानिक प्रशासन आणि जलसंसाधनावर काम करणाऱ्या विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्था भारतात कार्यरत असताना ग्रामीण भागाची दुष्काळातून सुटका कशी होत नाही, याचे कोडे सुटले पाहिजे. जलशक्ती अभियानाच्या पार्श्वभूमीवर हे सगळं समजून घेतलं पाहिजे.

गोड्या पाण्याचा सर्वाधिक म्हणजे ७० टक्के वापर शेतीत होतो आणि याच वापरात आज मोठा बदल झाला आहे. पाणीटंचाई मागचे हे एक महत्त्वाचे कारण आहे. स्वातंत्र्यानंतर अनेक धरणे बांधली गेली आणि पाणी साठा वाढला. पर्जन्यमान व भौगोलिक परिस्थितीशी अनुकूल असलेल्या पारंपरिक पीक पद्धतीला झुगारून बहुतांश ठिकाणी बाजार मागणीवर शेती चालू झाली. यामध्ये पाण्याचा वापर वाढत गेला आणि त्याचे वाटप असमतोल होत गेले. काही शेतकऱ्यांनी पाणी खर्चिक पिके घ्यायला सुरुवात केली आणि हळूहळू गावातले सगळेच त्या स्पर्धेत उतरले. जलसंसाधनाचे नियोजन हा राज्य सरकारचा विषय असला तरी अगदी स्थानिक पातळीवर याचे निर्णय घेतले जातात. गावांच्या मागणीनुसार जिल्हा पातळीवर त्याची धोरणे आखली जातात. अशी विकेंद्रित शासन पद्धत भारताला सुयोग्य असल्याचे मानले जाते, तरीही स्थानिक प्रशासन दुष्काळ टाळायला अपयशी का ठरते? जिल्हा पातळीवरील धोरणे निकामी का झाली?

त्यासाठी जलसंसाधनांच्या व्यवस्थापनाचे निर्णय प्रशासनाकडून स्थानिक पातळीवर कसे घेतले जातात, हे पाहावे लागेल. पाणी नियोजनाचे निर्णय गाव पातळीवर आज मुख्यतः चार गोष्टींवर आधारलेले असतात (अ) स्थानिक राजकीय पुढाऱ्यांचे ध्येय–आकांक्षा काय आहेत, पाणी समस्येचे त्यांचे आकलन किती सखोल आहे, निवडलेल्या

पर्यायाने भविष्यात होणाऱ्या परिणामांची त्यांना किती जाण आहे, नियोजनाच्या आखणीवर यांचा परिणाम निश्चित होतो. सामाजिक समस्यांना अनेक पैलू असतात व त्यांचा एकमेकांशी सहसंबंध असतो. पुढाऱ्यांची अधिक ओढ कोणत्या पैलूकडे आहे? वैयक्तिक अनुभव आणि आकलनाचा प्रभाव पडल्याने नियोजन एका व्यक्तिगत चौकटीत बांधले जाते (ब) अनेक वेळा स्थानिक जनसांख्यिकी घटकांवर (डेमोग्राफिक्स) निर्णय घेतले जातात. उदाहरणार्थ, ग्रामस्थांची सरासरी धारण जमीन, कुटुंबातील सदस्यांची सरासरी संख्या, घरटी उत्पन्न इत्यादी घटकांचा विचार करून नियोजन होते. वरवर पाहता हे घटक महत्त्वाचे वाटले तरी पाण्याच्या समन्यायी वाटपासाठी ते योग्य असतीलच असे नाही. यामुळे पाण्याचे नियोजन अचूक होत नाही (क) काही वेळा गावातील बळकट दबाव गटाचा प्रभाव नियोजनावर दिसतो. उदाहरणार्थ, त्या भागातील मोठ्या उत्पादकांचे गट किंवा ठरावीक पीक उत्पादकांचे गट–जसे ऊस उत्पादक. असा एखादा गट वरचढ असेल तर नियोजनातून त्यांच्या मागण्यांना पुष्टी दिली जाते. (ड) चालू स्थितीत कोणताही बदल न करणे, हाही एक नियोजनातील निर्णय असू शकतो. अगोदरच्या प्रशासकाने केलेल्या आराखड्यात आपण बदल करून नव्या चुका होऊ नये, म्हणून काही अधिकारी 'जैसे थे' ला प्राधान्य देतात.

अशा कारणांमुळे जलसंसाधनाच्या नियोजनात वैयक्तिक कल शिरतात, ज्यामुळे इष्टतम पर्याय निवडले जात नाहीत. परिणामी असे नियोजन अकार्यक्षम होते आणि पाण्याचा असमतोल वाटप होऊ लागतो; परंतु पाणी व्यवस्थापनाचे निर्णय जर ठोस आकडेवारीवर आधारित असतील तर वैयक्तिक प्राधान्य बाजूला ठेवून निर्णयात एका गटाची तरफदारी किंवा कोणावर भेदभाव होण्याचे टाळता येते. श्री. विलासराव साळुंखे यांनी 'पाणी पंचायत' या संस्थेतून याचे यशस्वी प्रयोग केले ज्यामुळे गावात पाण्याचा नियंत्रित वापर आणि गावकऱ्यांमध्ये समन्यायी पाणी वाटप होऊ शकला. पाण्याचे दुर्भिक्ष असलेल्या पुरंदर तालुक्यातील खळद पंचक्रोशीत 'पाणी पंचायत'ने हे प्रयोग केले. यासाठी विविध संस्थांकडून आणि प्रत्यक्ष पंचक्रोशीतून संख्यात्मक माहिती गोळा केली गेली आणि त्याचे विश्लेषण करून पाण्याचे नियोजन केले गेले. अशा प्रकारे केलेल्या आराखड्यात एक निष्पक्षपणा आणि पारदर्शकता असल्याने ग्रामस्थांना त्याचा स्वीकार करणे अवघड गेले नाही. पाणी पंचायतच्या खळद पंचक्रोशीतील या प्रयोगाचे तपशील पुढे दिले आहेत.

१९७२ साली खळदला प्रचंड दुष्काळ पडला आणि मोठ्या प्रमाणात अन्न–धान्याचा तुटवडा निर्माण झाला. अल्प पर्जन्यवृष्टीच्या या क्षेत्रात पाऊसपाण्याचे नियोजन आणि वापर हे दोन्ही अयोग्य होत असल्याच्या पार्श्वभूमीवर विलासराव साळुंखे यांनी 'ग्राम गौरव प्रतिष्ठान' या संस्थेची स्थापना केली आणि जलसंवर्धनाचे काम सुरू केले. यामध्ये पाणलोट क्षेत्राचा विकास, समन्यायी पाणी वाटप, सेंद्रिय शेती आणि ग्रामस्थांचे आरोग्य या चार गोष्टींवर काम करण्याचे ठरले. पुणे जिल्ह्याच्या पुरंदर तालुक्यात वसलेल्या पाच गावांच्या या पंचक्रोशीत बी.एम. ५८ आणि बी.एम. ५९ ही दोन पाणलोट क्षेत्र आहेत. कुंभारवळण, एकहातपूर, मुंजवडी आणि खानवडी ही गावे कऱ्हा नदीच्या उत्तरेकडे आहेत आणि खळद हे दक्षिणेकडे वसले आहे. पाणी नियोजन करण्याआधी पंचक्रोशीचा पाणी पुरवठा आणि पाणी वापर मांडला गेला. इथे पर्जन्यवृष्टी किती आहे, त्यापैकी वाहून किती जाते, किती साठविले जाते आणि पाझर किती होते याचा हिशेब लावला गेला. त्यानंतर या गावात दर कुटुंबाला हक्काचे पाणी किती मिळाले पाहिजे, हे पाहिले गेले. पाण्याचा आराखडा करण्यासाठी कोणत्या सांख्यिक माहितीचा आधार घ्यायचा, ही आकडेवारी कुठून मिळवायची आणि त्याचे विश्लेषण कसे करायचे, हे ठरविले गेले. यानंतर पंचक्रोशीमधील पाण्याचे साधे सोपे ताळेबंद रचले गेले. सर्व आकडेवारी मांडून संपूर्ण पाणलोट क्षेत्रात पर्जन्यवृष्टीतून वापरण्यायोग्य पाणी पुरवठा किती मिळतो, ते कळले आणि पाणलोट क्षेत्रातील पाणी वापराशी त्याचा हिशेब लावता आला.

आकडेवारीवर आधारित या हिशेबात कोणत्याही पुढाऱ्याचा किंवा गटाचा प्रभाव नसल्याने

गावकऱ्यांना हे गणित विश्वसनीय वाटले. आपला पाणी पुरवठा मर्यादित आहे आणि त्यात वाढ होणे शक्य नाही, हे उमगले. पाणी वापरावर नियंत्रण ठेवणे या एकाच मार्गाने पाणी टंचाई टाळता येईल, हेही स्पष्ट झाले. त्यामुळे या अनुषंगाने संपूर्ण पाणलोट क्षेत्राच्या पीक पद्धतीत बदल केले पाहिजेत, यावर एकमत झाले. हा उपाय शाश्वत करण्यासाठी पाण्याचे वाटप समन्यायी होणे गरजेचे आहे, हे ग्रामस्थांना पटले आणि त्या अनुषंगाने नियोजन केले गेले.

दुष्काळ पूर्णतः टाळता येणार नाही, हे तर उघड होते. त्यामुळे दुष्काळाची परिस्थिती आलीच तर त्यासाठी काहीतरी योजना पाहिजे, असा विलासरावांचा आग्रह होता. यासाठी त्यांनी गावकऱ्यांना सुचविले की फक्त बाजारासाठी शेती न करता काही भागात आपल्या कुटुंबाच्या गरजेपुरती लागवड करावी. घरटी एक एकर किंवा कमी क्षेत्रफळातून कुटुंबाची गरज भागू शकते. यामुळे जर दुष्काळ आलाच तर फक्त या क्षेत्रफळाला पाणी पुरवठा करून दुष्काळाची झळ कमी होईल. याचा दुसरा फायदा म्हणजे वर्षभर शेतीमाल विकत घेण्यासाठी गावकऱ्यांचे उत्पन्न खर्ची पडणार नाही. याचाही स्वीकार गावकऱ्यांकडून झाला. याप्रमाणे अंमलबजावणी झाली आणि पुढील काळात पाऊस कमी झाला तरी खळद पंचक्रोशीत १९७२ सारखा हाहाकार झाला नाही. हे विशेष! या प्रयोगातून अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. कोणत्याही गावात जलशक्ती अभियान राबविताना त्या लक्षात घेतल्या जायला हव्यात. म्हणून त्या विस्तारानं इथं देत आहोत.

१. कोणत्याही नियोजनात वैयक्तिक कल टाळता आला तर त्यावर गावकऱ्यांची संमती मिळणे अधिक सोपे होते. यासाठी सांख्यिक माहिती आणि पारंपरिक ज्ञान यांची सांगड घालणे प्रभावी ठरते.

२. आकडेवारी आणि सांख्यिक माहितीचे स्रोत विश्वासार्ह असले पाहिजेत. उदाहरणार्थ, जनगणना आयुक्त कार्यालय, महावितरण कचेरी किंवा सरकारी संकेतस्थळांवरून घेतलेली माहिती यावर गावकऱ्यांचा विश्वास असतो. खासगी संस्था आणि कंपन्यांकडून मिळणाऱ्या माहितीवर ते साशंक असतात.

३. आकडेवारीवर आधारित विश्लेषण निष्पक्ष असते आणि त्यात पारदर्शकता असते. त्यामुळे गावकऱ्यांना स्वतः निर्णय घेणे अवघड नसते. गावाचे पाणी नियोजन एखाद्या सिंचन अधिकाऱ्याने करण्यापेक्षा ते अधिक परिणामकारक ठरते.

४. गावकऱ्यांनी स्वतः पीक नियोजन केले तर त्याची अंमलबजावणी आणि त्यावर नियंत्रण सुलभ होते. यात अपवाद असले तरी गाव संघटित असल्याने त्यावर मात करता येते. प्रत्येकाची गरज सांभाळून पंचक्रोशीतील सर्वांचे हित जपले जाऊ शकते.

५. जलपदचिन्ह आणि आभासी पाणी प्रवाह या संकल्पनेचा वापर अत्यंत परिणामकारक होतो. एखाद्या पिकाचे जलपदचिन्ह आणि त्यातून मिळणारे उत्पन्न हे गणितही निर्णय घेण्यास प्रभावी ठरते.

कोणताही सामाजिक प्रश्न येणाऱ्या पिढ्यांच्या माथी पडू नये यासाठी शाश्वत मार्ग नेहमी महत्त्वाचा असतो. त्यासाठी पारंपरिक ज्ञानाला महत्त्व देऊन स्थानिक हवामान आणि भौगोलिक वैशिष्ट्यांचा विचार झाला पाहिजे, या गोष्टीकडे दुर्लक्ष होते म्हणूनच सरकारची अनुदाने एका भागात योग्य असली तरी ती दुसऱ्या ठिकाणी अनिष्ट असू शकतात. त्यामुळं चुकीच्या पिकांना सरकारी प्रोत्साहन मिळतं.

आज आपला पाण्याचा वापर गरजेच्या पिकांकडून खाद्यप्रक्रिया उद्योगाच्या मागणीचा पुरवठा करण्यात वाढत चालला आहे. हे 'जीडीपी'ला निश्चितपणे पोषक असले तरी यातून ग्रामीण भागातील पाणी समस्या अधिक गहन होत चालली आहे. याची दखल 'जलशक्ती अभियान' गावागावात राबविताना सरकार दरबारी आणि गावपातळीवर घेणं अत्यंत आवश्यक आहे. तसं झालं तरच दुष्काळावर आणि पर्यायानं पाणी समस्येवर मात करता येईल.

●●●

---

*डॉ. गुरुदास नूलकर हे शाश्वत विकासाचे अभ्यासक असून 'सिम्बायोसीस आंतरराष्ट्रीय विद्यापीठा'मध्ये प्राध्यापक आहेत.*
*संपर्क : gurudasn@gmail.com*
*कल्पनाताई साळुंखे या पाणी 'पंचायत'च्या विश्वस्त आहेत.*
*संपर्क : ksalunke279@gmail.com*